# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग
## मॅन्युअल क्र . १
## कलम ४(१)(ब)(i)
## कार्यालयाचा तपशिल, कामकाज आणि कर्तव्ये

कार्यालयाचे नाव - बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

पत्ता - पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मुख्य प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
पुणे मुंबई रस्ता, पिंपरी, पुणे ४११ ०१८.

कार्यालयीन दूरध्वनी क्र. - ०२० –६७३३३३३३ विस्तारित क्र. १३१७

कार्यालयीन वेळ - सकाळी ०९.४५ ते सायं. ६.१५
(साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून)

ई मेल - bldp@pcmcindia.gov.in

विभागाचे कामकाज तपशिल -

(अ) बांधकाम परवानगी – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेतील विकास परवाना देणेबाबतची कार्यवाही या विभागामार्फत करण्यात येते त्याअतंर्गत
(१) इमारतीचे नकाशे मंजूर करणे
(२) सुधारीत नकाशा मंजूरी देणे
(३) बांधकाम पुर्णत्वाचा य भोगवटापत्रक दाखला देणे.
(४) टी. डी. आर. युटिलायझेशन.

(ब) अनधिकृत धार्मिक स्थळे व मोबाईल टॉवरचे बांधकाम नियंत्रण - अनधिकृत बांधकामांना कायदेशीर तरतुदीस अनुसरुन अनधिकृत धार्मिक स्थळे व मोबाईल टॉवरच्या बांधकामांचा शोध घेणे, अशा अनधिकृत बांधकामांना नोटीसा देणे, तदनुषंगिक सर्व कार्यवाही पूर्ण करणे

(१) अनधिकृत सुरु असलेल्या धार्मिक स्थळे व मोबाईल टॉवरच्या बांधकामांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये नोटीसा देणे. तसेच सदर बांधकाम करणा-या इसमाविरुध्द गुन्हा दाखल करणे व निष्कासनाची कारवाई करणे.

(२) मनपा हद्दीतील पूर्ण झालेले धार्मिक स्थळे व मोबाईल टॉवरच्या अनधिकृत बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम चे कलम ५३ अन्वये नोटीसा देणे व निष्कासनाची कार्यवाही करणे.

(३) काही प्रकरणी अनधिकृत बांधकामधारकास नोटीस बजाविल्यानंतर संबधित अनधिकृत ( धार्मिक स्थळ व मोबाईल टॉवर ) बांधकामधारकाने सदर बांधकाम नियमीतीकरणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३(३) च्या तरतुदीनुसार मनपाच्या सदर विभागाकडे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ४४ अन्वये प्रकरणसादर केल्यास, अशा प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ४५ नुसार कार्यवाही करणे.

उपलब्ध सेवा - नागरी सुविधा केंद्रामार्फत उपलब्ध सेवा

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कामकाजाची मुदत |
|---|---|---|
| १ | बांधकाम परवानगी/बांधकाम सुरु करण्याचा दाखला/सुधारित बांधकाम परवानगी(Commencement Certificate) | ३० दिवस |
| २ | पुर्णत्वाचा दाखला | ८ दिवस |



मा. आयुक्त
अतिरिक्त आयुक्त
शहर अभियंता- ०१
कार्यकारी अभियंता (अ,ब , ड ) -०१
कार्यकारी अभियंता ( ग, ह, ड )- ०१
कार्यकारी अभियंता (क, ई, फ)- ०१
उप अभियंता- ०४
उप अभियंता - ०४
उप अभियंता - ०४
कनिष्ठ अभियंता - ०९
कनिष्ठ अभियंता - ०७
कार्यालयीन अधिक्षक - ०१
कनिष्ठ अभियंता-१४
आरेखक-०२
सर्व्हेअर ०२
बिट निरिक्षक- १९
आरेखक-०
सर्व्हेअर-०१
बिट निरिक्षक - ११
मुख्य लिपिक -३
उप लेखापाल - ०१
कॉम्प्यु. ऑपरेटर - २
वायरलेस ऑपरेटर- २
वाहन चालक - २
लिपिक-०५
शिपाई-०६ / मजूर -०२
आरेखक-०२
सर्व्हेअर०२
बिट निरिक्षक - ३३